# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**प्रेसनोट**

## गणेशोत्सवासाठी पीएमपीएमएल कडून जादा बसेसचे नियोजन

दरवर्षी प्रमाणे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दि. १९/०९/२०२३ ते दि. २८/०९/२०२३ या कालावधीमध्ये गणेशोत्सव साजरा होत असून गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहराबाहेरून व शहरांतर्गत नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असतात.

तसेच पिंपरी-चिंचवड शहरामधून पुणे शहरामध्ये गणेशोत्सव देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी संख्या पाहता पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य बस स्थानकांवरून दरवर्षी प्रमाणे यंदाही गर्दीनुसार रात्रभर बससेवा पुरविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने खालील ठिकाणांहून सुटणाऱ्या बसेसचा नियोजन तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | स्थानकाचे नाव | बस संख्या |
|---|---|---|
| १ | निगडी | ७० |
| २ | चिंचवडगाव | ३५ |
| ३ | भोसरी | ६२ |
| ४ | पिंपळे गुरव | २० |
| ५ | सांगवी | १५ |
| ६ | आकुर्डी रेल्वे स्टेशन | १६ |
| ७ | चिंचवडगाव मार्गे डांगे चौक | ३० |
| ८ | मुकाई चौक रावेत | १२ |
| ९ | चिखली/संभाजीनगर | १० |
| | **एकूण** | २७० |

उपरोक्त नुसार २७० बसेस या रात्रपाळीकरीता गणेशोत्सव कालावधीमध्ये वरील तक्त्यात नमूद स्थानकांवरून संचलनात ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

- दैनंदिन संचलन गणेशोत्सव कालावधीमध्ये रात्रौ १०.०० नंतर बंद राहणार असून रात्रौ १०.०० नंतर सर्व बसेस यात्रा स्पेशल म्हणून संचलनात राहणार आहेत.
- रात्रौ १०.०० नंतर बससेवेसाठी प्रचलित दरामध्ये रूपये ५/- जादा दर आकारणी करण्यात येईल.
- गणेशोत्सव कालावधीत देण्यात येणारी ही रात्रौ बससेवा खास बससेवा असल्याने सर्व पासधारकांस रात्रौ १२.०० वाजेपर्यंत पासाची सवलत ठेवण्यात आलेली आहे. **रात्रौ १२.०० नंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.**

श्री गणेशोत्सव कालावधीत वर दर्शविलेल्या तक्त्यामधील पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य बस स्थानकांवरून मनपा भवन पर्यंत रात्रौ गरजेनुसार बससेवा देण्यात येणार आहे. तसेच मुख्य स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे, याची सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १५/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**